# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
# सुधारीत प्रसिद्धी निवेदन

**समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५**

महाराष्ट्र शासनाच्या **शासन पत्र क्र. संकिर्ण २०२२/प्र.क्र. ८१/टीएनटी १., दि. १५/०९/२०२२ व शासन निर्णय दि. २९/०८/२०२५** अन्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी "**समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५**" या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने **दि. ०१/१२/२०२५ ते ०५/१२/२०२५** या कालावधीत आयोजन करण्यात येणार असले बाबत दि.२९/०९/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. परीक्षेबाबतची अधिसूचना, वेळापत्रक व ऑनलाईन आवेदनपत्राबाबतची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तथापि काही तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव सदर परीक्षेचे आयोजन **जानेवारी / फेब्रुवारी - २०२६** मध्ये घेण्याचे नियोजित असून सुधारीत परीक्षेच्या तारखा यथावकाश परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

सदर परिक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची मुदत **दि.१०/११/२०२५** होती. तरी सदर आवेदनपत्र भरणेची मुदत **दि.०१/०१/२०२६** पर्यंत करण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवारांचा अनुभव, शैक्षणिक पात्रता ही **दि.०१/०१/२०२६** रोजीची अंतिम समजण्यात येईल.

त्यानुसार सर्व पात्र उमेवारांनी/परीक्षार्थींनी विहीत मुदतीत आवेनदपत्र भरण्याची कार्यवाही करावी.

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४

**ठिकाण : पुणे**
**दिनांक :४/११/२०२५**